महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 26 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 242 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



## भाजपा, अध्यात्मिक आघाडीतर्फे होमात्मक लघुरुद्र अनुष्ठान

### आ. निरंजन डावखरे यांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, दि. २५ :** समन्वय प्रतिष्ठान आणि भाजप अध्यात्मिक समन्वय आघाडी व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने महाशिवरात्रीच्या निमित्ताने बुधवारी (ता. २६ फेब्रुवारी) होमात्मक लघुरुद्र अधिष्ठान आयोजित करण्यात आले आहे. समन्वय प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी जांभळी नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान,येथे आचार्य आशिषकुमार जानी यांच्या उपस्थितीत हा शिवशंकरांची आराधना करणारा महायज्ञ पार पडणार आहे. नागरिकांना सुख, समृद्धी, शांती आणि उत्तम आरोग्य लाभण्यासाठी या होमात्मक रुद्राचे आयोजन केले जाते. मंगलमय वातावरणात बुधवारी सकाळी ७ वाजता होमाला सुरुवात होईल. त्यात मान्यवर व्यक्तींबरोबरच शहरातील शेकडो दांपत्ये सहभागी होणार आहेत. तरी शिवभक्तांनी ह्या पवित्र कार्यास उपस्थिती दर्शवुन महादेवांची आराधना करुन तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वय प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. निरंजन डावखरे, भाजपा अध्यात्मिक आघाडीचे संयोजक अश्विनी पटवर्धन आणि दिलीप नामजोशी यांनी केले आहे.

# राज्यात पुन्हा राजकीय भूकंपाचे संकेत ?

## चंद्रशेखर बावनकुळे आणि जयंत पाटील यांची गुप्त भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची मध्यरात्री भेट झाल्याची चर्चा आहे. मध्यरात्री एक तास भेट घेऊन चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, ही भेट मध्यरात्री नाही तर रात्रीच्या वेळेस झाल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले.



जयंत पाटील हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली आहे. यामुळे भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. राष्ट्रवादी (एसपी) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट झाली पण ही भेट मध्यरात्री नाही तर रात्री 7.50 मिनिटांनी झाल्याचा खुलासा जयंत पाटील यांनी केला आहे. तसेच या भेटीत काय चर्चा झाली याचा खुलासा देखील जयंत पाटील यांनी केला आहे. साधारण आठ वाजण्याच्या सुमारास चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शासकीय बंगल्यावर भेटीसाठी गेलो असे जयंत पाटील यांनी सांगितले. 25 मिनिटे भेट झाली.भेटीनंतर आपण स्वतः पाटील यांना निवासस्थानाबाहेर सोडल्याचा खुलासा बावनकुळे यांनी केला आहे.

ही भेट राजकीय नसून सांगली जिल्ह्यातील महसूल प्रश्न, सातबारा, सांगलीकरणावर चर्चा झाली. जयंत पाटील यांच्या मतदारसंघातील कामासाठी भेट झाल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. मतदार संघातील विविध विषयांवर या भेटीत चर्चा केल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले.

बावनकुळे आणि माझी भेट सांगली जिल्ह्यातील महसूलच्या प्रश्नाबाबत झाली, कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली. काल संध्याकाळी सात वाजून पन्नास मिनिटांनी माजी आणि बावनकुळे यांची भेट झाली . सांगली जिल्ह्यातील महसूल प्रश्नांवर मी त्यांना दहा-बारा निवेदन दिले. ते देण्यासाठीच त्यांना वेळ मागितली होती. महसूल वीभागात सातबारा संगणीकरण ऑनलाइन केले. त्याच्या दुरुस्त्या वेळेवर होत नाहीत. हा राज्याचा प्रश्न होता. त्याकडे त्यांचे लक्ष वेधल. काय जमिनीचे विषय होते. जिल्ह्याचे बरेच प्रश्न होते त्यासाठी त्यांना भेटलो. त्यांच्या घरी 25 मिनिटांची भेट झाली. यात काय राजकीय चर्चा नाही. सोबत राधाकृष्ण विखे पाटील होते. निवेदनाचा रेकॉर्ड पाहा. 13 14 निवेदन दिली असे जयंत पाटील म्हणाले.



## आ. किसन कथोरेंची इतर मागास कल्याण समितीच्या आध्यक्ष पदी निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांची महाराष्ट राज्य इतर मागासवर्गीय कल्याण समितीच्या आध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. इतर मागास समाजाच्या कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी या समिती मार्फत केली जाते. त्यामुळे किसन कथोरे यांचे सर्वच थरातून अभिनंदन होतं आहे.**



## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थ्यांच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयात आज मंगळवारी (दि.२५) यासंदर्भातील याचिकेवर सुनावणी होणार होती. मात्र, आज सुनावणी झालीच नाही. याप्रकरणी आता पुढील सुनावणी ४ मार्चला होणार आहे. विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. तशी मोर्चेबांधणी विविध पक्षांकडून सुरू झाली आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयात आज कोणतीही सुनावणी न झाल्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी साडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, याविषयी सर्वांच्या मनात कुतूहल आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून आज यावर सुनावणी होऊन निकाल लागण्याच्या अनेकांच्या अपेक्षा होत्या. मात्र, आज सुनावणी न झाल्याने इच्छुकांच्या आशेवर पाणी फेरले गेले आहे. इच्छुकांना आता ४ मार्चपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

...तर महापालिका निवडणुका थेट सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये निवडणुका रखडल्याने मुंबई, पुण्यासह राज्यातील २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. ओबीसी आरक्षण प्रभागरचना इत्यादींवरून निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात वेगवेगळ्या याचिका दाखल आहेत. महापालिका निवडणुकांसाठी ज्या महापालिकांमध्ये पुन्हा नव्याने प्रभागरचना करणे आवश्यक असल्यास नव्याने प्रभाग रचनेची संपूर्ण प्रक्रिया पार पडून अंतिम प्रभाग रचना तयार होण्यासाठी साधारण ९० दिवसांचा कालावधी अपेक्षित असतो. त्यामुळे किमान फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत निकाल लागल्यास या निवडणुका एप्रिल-मे महिन्याच्या दरम्यान घेणे शक्य होईल. मात्र, तसे न झाल्यास महापालिका निवडणुका सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलल्या जाऊ शकतात.

## मंत्रिमंडळ बैठकीत फडणवीस सरकारचे सात मोठे निर्णय

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयातील मत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या मत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. मत्रिमंडळ बैठकीतील निर्णय, पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता देण्यात आली असून राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती स्थापन करण्यार असल्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच, बारामती येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहेत. यासाठी 564.58 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, बीड जिल्ह्यातील परळी येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी 564.58 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम 18(3) 1955 मध्ये सुधारणा तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश 2025 ला मान्यता देण्यात अली आहे. पुण्यातील मुळशी तालुक्यातील पौड येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. तर, 1976 पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा 332 गावठाणासाठी 599.75 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



**(विधी व न्याय विभाग)**
ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी

**(नियोजन विभाग)**
बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी

**(वित्त विभाग)**
१९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाणासाठी ५९९.७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजूरी

**(कृषि व पदुम विभाग)**
परळी, जिल्हा बीड येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी

**(कृषि व पदुम विभाग)**
महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम १८(३) १९५५ मध्ये सुधारणा, तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला मान्यता

**(मदत व पुनर्वसन विभाग)**
राज अन् उद्धव ठाकरे एकत्र येणार? खासदार संजय राऊतांनी स्पष्टच सांगितलं महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती.

**पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्यासाठी १,१२९.१६ कोटी मंजुर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंत्रालयामध्ये पार पडली. या बैठकीमध्ये सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर नेते उपस्थित होते. या बैठकीत परळी आणि बारामतीत पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी फडणवीस सरकारकडून तब्बल १,१२९.१६ कोटींची मंजुरी देण्यात आली आहे.

# शहापूरकर शुद्ध पाण्यापासून वंचित

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूरकरांची पिण्याच्या पाण्याची टाकी व जलशुद्धीकरण केंद्र एक वर्षांपासून रखडले; शहापूर करांना अपुरा पाणीपुरवठा व फिल्टर पाणी मिळत नसल्याने आरोग्य धोक्यात* शहापूर नगरपंचायतीत 9 लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी व 3 एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण पाण्याची टाकी मंजुर होऊन होऊन एक वर्ष झाले व तत्कालीन खासदार तथा पंचायत राज केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते सदर टाकीच्या कामाचे उदघाटन होऊन तब्ब्ल एक वर्ष उलटत आले तरी ठेकेदार कंपनीकडून या पाण्याच्या टाकीचे व जलशुद्धीकरण केंद्राचे काम अर्धवट अवस्थेत बंद असल्याने शहापूर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना पिण्याच्या शुद्ध पाण्यापासून वंचित रहावे लागत असून त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.




याबाबत शहापूर नगरपंचायतचे अधिकारी व नगरसेवकाच्या चर्चेला संबंधित ठेकेदार प्रतिसाद देत नसल्याने नगरपंचायत हतबल झाल्याचे निदर्शनास येत असून पाण्याच्या टाकीच्या कामास विलंब लावणाऱ्या संबंधित ठेकेदारावर कारवाई करून नवीन टेंडर काढण्याची मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

शहापूर नगरपंचायत हद्दीतील ९ लाख लिटर क्षमतेची पाण्याचीटाकी बांधण्याचे कार्यारंभ आदेश नगरपंचायतकडून संबंधित ठेकेदाराला देण्यात आले असून या पाण्याच्या टाकीचा अंदाजित खर्च १ कोटी ४७ लाख ४८ हजार ८१७ इतका आहे.सदर निविदेतील अटी-शर्ती व मंजूर ठराव तसेच ठेकेदार कंपनीने करून दिलेला करारनामा यांचे अधिन राहून सदरचे काम तात्काळ सुरु करून २७० दिवस मुदतीत पूर्ण करून देण्याचे कार्यादेश उल्हासनगर येथील कंपनीला देण्यात आले आहेत. मात्र वर्ष उलटूनही सदर टाकीचे बांधकाम होत नसल्याने शहापूरकरांना अपुरा पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.तसेच शहापूरातील नवीन पाणी पुरवठा योजनेवर ३ एमएलडी कॉम्पॅक्ट जल शुद्धीकरण केंद्र उभारण्याचे काम बदलापूर येथील माना इलेक्ट्रिक आणि इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना देण्यात आले आहे.परंतु तेही अर्धवट अवस्थेत बंद असल्याने शहापूर करांना फिल्टर पाणी मिळत नसल्याने आरोग्य धोक्यात आले आहे.

ठेकेदार कंपनीच्या उदासीनतेमुळे शहापूर नगरपंचायत हद्धीतील सुमारे २५ हजाराच्या वरील नागरिक शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत.फिल्टरेशन प्लांटच्या कामात तांत्रिक अडचणी आल्यामुळे काम थांबले होते पण आता तांत्रिक अडचण दूर झाली असून फिल्टरेशन प्लांटच्या विविध भागांचे काम नागपूर येथे सुरू असून तो प्लांट तयार करून मार्च अखेरीस शहापुरात आणून बसविण्यात येणार असल्याचे माना इलेक्टरीक सर्व्हिसेसचे व्यवस्थापक त्रिवेदी यांनी सांगितले.

> "शहापूरातील दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाण्याची टाकी व आरोग्य चांगले रहावे यासाठी फिल्टरेशन प्लांट मंजूर करण्यात आला असून नगरपंचायतने कामातील तात्रिक अडचणी दूर करून येथील पाण्याची टाकी व फिल्टरेशन प्लांटचे काम पूर्ण करून शहापूरकराना स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध करावे." - विजय देशमुख, शहापूर सहसंपर्कप्रमुख, ठाकरे गट शिवसेना.

> "सदर पाण्याच्या ठेकेदाराला दोन नोटीस बजावण्यात आल्या असून तिसरी ेटीस बजावण्यात येईल व त्यानंतर सदर ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून नवीन टेंडर करण्यात येईल व जलशुद्धीकरण केंद्राचे काम अर्धे पूर्ण झाले असून तात्रिक अडचणीमुळे ते काम बंद होते त्यातील तात्रिक अडचण दूर करण्यात आली असून मार्च पर्यंत जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण करून घेण्याचा आमचा प्रयत्न आहे." - शिवराज गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपंचायत शहापूर.

## गीतासार



न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन । नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ ३-२२ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), मला या तिन्ही लोकांत काहीही कर्तव्य नाही आणि मिळविण्याजोगी कोणतीही वस्तू मिळाली नाही, असे नाही. तरीही मी कर्तव्य कर्म करीतच असतो. ॥ ३-२२ ॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः । मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ३-२३ ॥

कारण हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जर का मी सावध राहून कर्मे केली नाहीत, तर मोठे नुकसान होईल, कारण मनुष्य सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुकरण करतात. ॥ ३-२३ ॥

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् । सङ्करस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ ३-२४ ॥

म्हणून जर मी कर्मे केली नाहीत, तर ही सर्व माणसे नष्ट-भ्रष्ट होतील आणि मी संकरतेचे कारण होईन, तसेच या सर्व प्रजेचा घात करणारा होईन. ॥ ३-२४ ॥

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत । कुर्याद्विद्वांस्तथा सक्तश्चिकीर्षुर्लोक सङ्ग्रहम् ॥ ३-२५ ॥

हे भारता(भरतवंशी अर्जुना), कर्मांत आसक्त असणारे अज्ञानी लोक ज्या रीतीने कर्मे करतात, त्याच रीतीने आसक्ती नसलेल्या विद्वानानेही लोकसंग्रह करण्याच्या इच्छेने कर्मे करावीत. ॥ ३-२५ ॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् । जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ ३-२६ ॥

परमात्मस्वरूपात स्थिर असलेल्या ज्ञानी मनुष्याने शास्त्रविहित कर्मांत आसक्ती असलेल्या अज्ञानी लोकांच्या बुद्धीत भ्रम म्हणजेच कर्मांविषयी अश्रद्धा निर्माण करू नये. उलट स्वतः शास्त्रविहित सर्व कर्मे उत्तमप्रकारे करीत त्यांच्याकडूनही तशीच करून घ्यावीत. ॥ ३-२६ ॥

## रेसिपी

### पंचामृत



**महाशिवरात्रीला शिवलिंगाला पंचामृत करा अर्पण**

महाशिवरात्रीच्या दिवशी भाविक शिवलिंगावर जलाभिषेक करतात. तसेच शिवलिंगावर पंचामृतदेखील अर्पण करतात. पंचामृत अर्पण केल्याने महादेव प्रसन्न होतात असे म्हटले जाते.

**पंचामृत म्हणजे काय?**

पंचामृत म्हणजे पाच पवित्र वस्तूंनी तयार केलेला प्रसाद, तो बनवण्यासाठी पाच अमृत म्हणजे- दूध, दही, तूप, मध आणि साखरेचा वापर केला जातो. याचा वापर तुम्ही देवाला अभिषेक करण्यासाठी तसेच प्रसादासाठीही केरू शकता. याच्या सेवनानेही अनेक फायदे होतात.

**पंचामृत बनवण्यासाठी लागणारे साहित्य**

१ कप गायीचे कच्चे दूध
१/२ कप दही
१ चमचा तूप
१ चमचा मध
१ चमचा साखर

**पंचामृत कसे बनवायचे?**

पंचामृत बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात कच्चे गाईचे दूध घाला. त्यात दही, तूप, मध आणि साखर घाला. आता तुम्ही सर्व गोष्टी व्यवस्थित मिसळा. शेवटी, वर तुळशीची पाने घाला. अशा प्रकारे पंचामृत तयार होते. महाशिवरात्रीच्या दिवशी तुम्ही हे भगवान शिवाला समर्पित करू शकता.

# गझल सम्राट - पंकज उधास

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है... या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार,



आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील

# सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे निलंबित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील अ प्रभागाचे यापूर्वीचे सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना अनाधिकृत बांधकाम रोखण्यात अपयशी ठरल्याचा ठपका ठेवत निलंबन कारवाई करण्यात आल्याने अनाधिकृत बांधकाम रोखण्यात जे सहाय्यक आयुक्त कामयाब होणार नाही त्यांची आता खैर नाही असे यानिमित्ताने चित्र दिसत आहे.




कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील 65 इमारतींचा रेरा घोटाळा अनाधिकृत बांधकाम प्रश्नावरून न्यायालयाने केडीएमसीला फटकारले असल्याचे समजते. जागृत झालेल्या प्रशासनाने अनाधिकृत बांधकामे पाडण्याच्या धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. असे असताना देखील अ प्रभागाचे तत्कालीन सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांच्या कारकिर्दीत अनाधिकृत बांधकामाचे पेव अ प्रभाग क्षेत्रात पेव फुटले. टिटवाळा रिंग रोड लगत इंदिरा नगर, गणेश नगर, बल्याणी, उभर्णी, मोहीली, गाळेगाव, मोहने, अटाळी, आंबिवली, बंदरपाडा, शहाड आदि परिसरात वाढत्या अनाधिकृत बांधकामा प्रश्नी तक्रारी, पाहता सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांनी थातुरमातुर कारवाई करीत एक प्रकारे कानाडोळा केला.

याबाबत आयुक्त इंदू राणी जाखड यांनी देखील अनाधिकृत बांधकामावर ठोस कारवाई करा अशी समज संदीप रोकडे यांना दिल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली. परंतु यातून त्यांनी बोध न घेता. कागदीखेळ रंगविण्यात वेळ घालवला. अशातच त्यांची बदली झाली. आणि अखेर अ प्रभागातील अनाधिकृत बांधकाम प्रश्नी त्यांच्यावर ठपका ठेवित अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्यासहीनिशी संदीप रोकडे यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत.

# नकली नोटा अदलाबदल करणारी टोळी गजाआड




## वाडा पोलिसांची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर : पालघर जिल्ह्यातील वाडा पोलीस ठाणे हद्दीत भारतीय चलनाच्या खऱ्या नोटा व खऱ्या नोटा प्रमाणे दिसणाऱ्या लहान मुलांच्या खेळातील नकली नोटा. एकत्र करून चलनात आणण्यासाठी, नोटा आदला बदली करण्यासाठी, वाडा तालुक्यातील पाली नाका, येथे काही इसम येणार असल्याची खात्रीलायक माहिती. वाडा पो. ठाणे प्रभारी पोलीस अधिकारी यांना दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी मिळून आली असता. वाडा पो. ठाणे येथील कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी. वेशांतर करून, सावज हेरण्यासाठी, पाली - नाका, जि. प. शाळा गेट, येथे सापळा रचून, दबा धरून बसलेले असताना, विक्रमगड बाजूने येणारी सिल्वर रंगाची, मारूती अर्निको कार नंबर - एम एच. ०४, जे एम ३१३५ थांबली. या गाडीतून दोन इसम उतरले. व ते तेथे काळ्या रंगाची बॅग घेऊन उभ्या असलेल्या इसमा कडे जाऊन काही तरी चर्चा करीत असतांना, वाडा पोलीस ठाणे पथकातील दबा धरून बसलेल्या पोलीस पथकाने अचानक पणे, झडप घेऊन त्या इसमानंची झाडा झडती घेतली असताना. खालील प्रमाणे नकली / असली नोटा मिळून आल्या आहेत. 100 रूपयांच्या नोटा १७ बंडल ₹500 चे १६ बंडल ज्या नकली आहेत. ₹५०० आणि ₹100 चे बंडल मध्ये वरती आणि खाली असली नोटा व मध्ये सर्व नकली नोटा. एकुण १४ लक्ष रुपये किंमत असलेल्या तर ५०० रूपये किंमतीच्या असली नोंटाची २ बंडल. एक लाख रुपये मिळून आले आहे. तसेच नोटा बनविण्यासाठी वापरत येत असलेले कागद, पारदर्शी प्लास्टिक पेपर, चिकट पट्टी असा अंदाजे १५ लक्ष रूपये किंमतीचा मुद्दे माल मिळून आला आहे. या अनुषंगाने विकास उर्फ विक्की प्रकाश पवार 32 वर्ष, रा. शिरिषपाड़ा, वाडा, इम्तियाज बशीर शेख 56 वर्ष, रा. कासा बुद्रुक, विक्रमगड, वसीम अनवर सैयद 36 वर्ष,रा. क-हे तलावली, विक्रमगड यांना पोलीसांनी ताब्यात घेतले असून, वाडा पुलिस स्टेशन मध्ये गु.र.नं. 83/2025 ने, भारतीय दंड संहिता की कलम 318(4), 180, 182, 3(5) अनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. बाळासाहेब पाटील - अधिक्षक पालघर यांच्या अधिपत्याखाली व वरिष्ठ पोलीस अधिकारी पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी अधिकारी, अंमलदार पुढील तपास करत आहे.

सदर कारवाई मा. श्री. बाळासाहेब पाटील - पोलिस अधीक्षक पालघर, अप्पर पुलिस अधीक्षक - विनायक नरळे, उपविभागीय पुलिस अधिकारी गणपत पिंगळे यांच्या मार्गदर्शन खाली वाडा पो. ठाणे प्रभारी अधिकारी अधिकारी श्री. दत्तात्रय किंद्रे, पो. निरीक्षक, उपनिरीक्षक सागर मालकर, मयुरेश अंबाजी, मयुर शेवाळे, पोलिस हवालदार - गुरुनाथ गोतारने, विजय मढवी, पो. नाईक - मनोज चौधरी, पो. शिपाई - गजानन जाधव, भुषण खिल्लारे, संतोष वाकचौरे यांनी यशस्वी केली आहे.

# शिवजयंती निमित्त रक्तदान शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता : शहापूर ग्रामिण : शिवजयंती निमित्ताने राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने व उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय रक्तपेढी यांच्या सहयोगाने कांबा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने व उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय रक्तपेढी यांच्या सहयोगाने कांबा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये नागरिकांनी उत्स्फुर्तपणे पणे सहभाग



घेऊन 70 रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर विशेष म्हणजे महिलांनी सुद्धा या शिबिरामध्ये सहभाग घेत 08 महिलांनी रक्तदान केले. तसेच कांबा ग्रामस्थांच्या वतीने शिवजयंती निमित्त रांगोळी स्पर्धा व शिव व्याख्याते संजय चौधरी यांचे शिवव्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरासाठी उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय रक्तपेढीचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. विलास वाघमारे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी डॉ.हरीश बागडे व कर्मचारी यांनी सहकार्य केले. या रक्तदान शिबिराचा उत्साह पाहून त्यांनी सर्व रक्तदाते व प्रतिष्ठानच्या सदस्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमावेळी कांबा गावातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय, सामाजिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य कांबा ग्रामस्थ, जि. प. शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. तर या शिबिरासाठी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम हाती घेतले होते.

# ठाकूर श्यामनारायण अभियांत्रिकी महाविद्यालयाचे वृक्षारोपण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता : 'एक पेड मा के नाम' या अभियाना अंतर्गत बोरीवली पूर्व येथील ठाकूर श्यामनारायण इंजीनियरिंग महाविद्यालय यांच्या वतीने बोरिवली पूर्व येथील ९० फिट रोडवर शिवालीक टॉवर जवळ असलेल्या महानगरपालिकेच्या मैदानावर वृक्षारोपण केले गेले. यादरम्यान पंचवीस वृक्षांचे रोपण करण्यात आले त्यासोबत आपल्या आईचे



नाव घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यांनी त्या वृक्षाला क्यू आर कोड दिले आणि त्या स्वरूपात त्या वृक्षाची माहिती त्या क्यू आर कोड मध्ये उपलब्ध केली गेली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सीईओ श्री राजेश सिंह आणि प्राचार्य डॉ. एस एम गणाचारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाले. या वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये महानगरपालिका अधिकारी सहाय्यक आयुक्त आर मध्य विभाग श्रीमती संध्या नांदेडकर तसेच ठाकूर श्यामनारायण इंजीनियरिंग कॉलेजचे शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच इतर पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग होता.

# खड्ड्यामुळे डॉक्टरचा मृत्यू

उल्हासनगरः एका खड्डयात दुचाकी आदळल्याने झालेल्या अपघातात एका २८ वर्षीय डॉक्टरचा उल्हासनगरात मृत्यू झाला आहे. उल्हासनगरच्या १७ सेक्शनच्या हिरा घाट परिसरात हा अपघात झाला असून खड्ड्यामुळे तरूण डॉक्टरचा मृत्यू झाल्याने संताप व्यक्त होतो आहे. हनुमंत डोईफोडे असे या डॉक्टरांचे नाव असून ते उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रूग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञ प्रशिक्षणार्थी डॉक्टर म्हणून कार्यरत होते.

हिंदू नववर्ष स्वागतयात्रा अंतर्गत

# कल्याणमध्ये भागवत सप्ताह संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता : कल्याण : इनरव्हील क्लब ऑफ कल्याण व कल्याण संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिंदू नववर्ष स्वागतयात्रा २०२५ अंतर्गत लक्ष्मीनारायण हॉल, टिळक चौक, कल्याण पश्चिम येथे आयोजित भागवत सप्ताहाची रविवारी सांगता झाली.

भागवताचार्य वासंती केळकर यांनी आपल्या सुमधूर वाणीत भागवत कथन केले. संपूर्ण आठवडा चैतन्यमय वातावरण होते. प्रचंड उत्साहाने सर्व नागरिक रोज या भागवत सप्ताहास हजर राहत होते. केडीएमसी आयुक्त डॉ.



इंदूराणी जाखड, शहर अभियंता अनिता परदेशी, माजी आमदार नरेंद्र पवार, अनंत हलवाईचे प्रफुल्ल गवळी, डॉ प्रशांत पाटील, सीए महेश भिवंडीकर अशा अनेक मान्यवरांनी देखील या भागवत सप्ताहात उपस्थिती दर्शविली.

इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या सर्व सभासद तसेच कल्याण संस्कृती मंचचे सर्व पदाधिकारी यांच्या अथक परिश्रमाने हा कार्यक्रम अत्यंत सुरेखरीत्या पार पडला. भागवताचार्य वासंती केळकर, उपस्थित नागरिक, मान्यवर तसेच या कार्यक्रमास विशेष आर्थिक सहकार्य करणाऱ्या अनंत हलवाई या सर्वांचे इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा डॉ. अर्चना सोमाणी, सचिव ॲड. नीता कदम, प्रकल्प प्रमुख ॲड. अर्चना सबनीस, स्वागतयात्रा प्रमुख मीनाक्षी देवकर तसेच कल्याण संस्कृती मंचचे अध्यक्ष डॉ. सुश्रुत वैद्य, सचिव अमोल जोशी यांनी आभार व्यक्त केले.



कैलासराणा शिव चंद्रमौळी,फणींद्र माथा मुकुटी झळाळी,
कारुण्य सिंधु भव दुःख हारी,तुज विण शंभु मज कोण तारी

महाशिवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा!

# अनाधिकृत बांधकामे : चार जणांवर एमआरटीपी गुन्हा दाखल

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील 65 इमारतींचा रेरा प्रश्न आणि अनाधिकृत बांधकाम प्रश्न ऐरणीवर आला असल्याने मानपाचे पुरते वाभाडे निघाले असल्याचे चित्र दिसत असताना केडीएमसीच्या आय प्रभागात अनाधिकृत बांधकाम केल्या प्रकरणी अधीक्षक यांच्या तक्रारी वरून हिल लाईन पोलिस स्टेशन मध्ये 4 जणांवर एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या भुमाफिया, चाळ माफियांच धाबे दणाणले असल्याचे चित्र दिसत आहे.

केडीएमसी आय प्रभागाचे अधीक्षक शंकर जाधव यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार आय प्रभागात बांधकामधारक बाळकृष्ण फुलोरे, मंगेश फुलोरे, सुनिल राणे, सचिन म्हात्रे यांचे श्रीमलंगरोड, पुंडलिक म्हात्रे शाळेच्या मागे मौजे वसार डावलपाडा येथे बेकायदेशीर चाळींचे बांधकाम करत असल्याबाबत कागदपत्रे सादर करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 260 व 267 (1) अन्वये जा. क्र. कडोंमपा/ 9 आयप्रक्षे/अबांनि/536, दिनांक 27/12/2024 रोजी नोटीस देण्यात आली होती. परंतू बाळकृष्ण फुलोरे, मंगेश फुलोरे, सुनिल राणे, सचिन म्हात्रे यांनी बांधकाम अधिकृततेबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यानंतर तसेच त्यांनी बांधकाम काढून टाकले नसल्याचे 18फेब्रुवारी 2025रोजी संदर्भीत बांधकाम ठिकाणी अधीक्षक जाधव आणि सहकारी गेले असता श्रीमलंगरोड, पुंडलिक म्हात्रे शाळेच्या मागे मौजे वसार डावलपाडा येथे जावुन समक्ष पाहणी केली असता त्याठिकाणी अनधिकृत बांधलेल्या चाळीचे बांधकाम काढुन टाकलेले नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे बाळकृष्ण फुलोरे, मंगेश फुलोरे, सुनिल राणे व सचिन म्हात्रे या बांधकाम धारकांवर विनापरवाना अनाधिकृतपणे चाळीचे बांधकाम केल्याने एमआरटीपी अंतर्गत हिल लाईन पोलीस स्टेशन मध्ये पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# यंदा उन्हाळा महिनाभर आधीच

## तीव्र उष्णतेने नागरिक त्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

नागपूर : होळीनंतर सुरू होणारा उन्हाळा यंदा महिनाभर आधीच सुरू झाला आहे. उन्हाळ्याची नुसती सुरुवातच झालेली नाही तर उन्हाच्या तीव्र झळा आणि उकाड्याने नागरिकांना त्रस्त केले आहे. अशातच आता भारतीय हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांना आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.



महाराष्ट्रच नाही तर देशाच्या अनेक भागांमध्ये उन्हाच्या तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. देशाची राजधानी दिल्लीत रात्री आणि पहाटेच्या सुमारास थंडी असली तरीही दिवसा तापणारे उन्ह मात्र चटका देणारेच आहे. साधारण होळीला उन्हाची सुरुवात होते आणि एप्रिल व मे महिन्यात उन्हाचा तडाखा जाणवायला सुरुवात होते.

यंदा एप्रिल आणि मे महिना अजून यायचाच आहे. एवढेच नाही तर मार्च देखील यायचा आहे आणि असे असतानाच उन्हाच्या झळा तीव्र होण्यास सुरुवात झाली आहे. मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये आतापासूनच उन्हाचा तडाखा जाणवत आहे. फेब्रुवारीपासूनच कमाल तापमानात सातत्याने वाढ होताना दिसत आहे.

महाराष्ट्रातून हिवाळा कधीचाच हद्दपार झालाय. दरम्यानच्या काळात रात्री आणि पहाटे थंडी तर दिवसा उन्ह अशी स्थिती होती. मात्र, आता पूर्णपणे उन्हाळ्याची सुरुवात राज्यात झाली आहे. फेब्रुवारीच्या पूर्वार्धातच कमाल तापमानाने चाळीशी पार केली. त्यामुळे यंदाचा एप्रिल, मे महिना आणखी किती तापदायक असणार अशी भीती आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार आज आणि उद्या पश्चिम महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा चांगलाच जाणवणार आहे. तर, कोकण आणि जवळच्या परिसरात उष्ण आणि दमट हवामानाची स्थिती असून याठिकाणी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

विदर्भातही उकाड्यात प्रचंड वाढ झाली असून उन्हाचे चटके देखील जाणवत आहेत. उत्तर महाराष्ट्रात मात्र अजूनही काही ठिकाणी पहाटेच्या वेळी काही जिल्ह्यांमध्ये गारठा जाणवत आहे. दरम्यान, २५ आणि २६ फेब्रुवारी असे दोन दिवस राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. २५ फेब्रुवारीला मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी तर २६ फेब्रुवारीला पालघर येथे तापमानवाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देखील देण्यात आला आहे. याशिवाय संपूर्ण राज्यातच येत्या काही दिवसात तापमानवाढ कायम राहील, असा इशारा देखील देण्यात आला आहे. त्यामुळे यंदा उन्हाळा कडक तापणार हे निश्चित आहे.

# घरांचा प्रश्न गिरणी कामगार संतप्त

## सरकारला मोर्चाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

मुंबई : दीड लाख गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्याच्यादृष्टीने अद्यापही राज्य सरकारकडून ठोस पाऊले उलचण्यात आलेली नाहीत. सर्वच्या सर्व गिरणी कामगारांना मुंबईतच घरे देण्याची गिरणी कामगार आणि गिरणी कामगार संघटनांची मागणी असताना राज्य सरकारने गिरणी कामगारांना मुंबईबाहेर फेकण्याचा घाट घातला आहे. त्यासाठी दोन ठिकाणी गृहप्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. एकूणच राज्य सरकार गिरणी कागमारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत गंभीर नसून कामगारांना विश्वासात घेतले जात नसल्याचा आरोप करीत सरसकट गिरणी कामगारांना मुंबईतच घरे द्यावीत या मागणीसाठी गिरणी कामगार ६ मार्चला आझाद मैदानावर धडकणार आहेत. 'गिरणी कामगार एकजूट'तर्फे ६ मार्चला मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांना घरे देण्याच्या राज्य सरकारच्या योजनेअंतर्गत म्हाडाकडे पावणेदोन लाख अर्ज दाखल झाले आहेत. मात्र यातील केवळ पंचवीस हजार गिरणी कामगारांनाच सरकार घरे देऊ शकणार आहे.



# रायगड एकात्मिक बाल विकास विभागात चार कोटींचा अपहार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

अलिबाग : रायगड जिल्हा परिषदेतील अपहार प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे. पाणी पुरवठा विभागापाठोपाठ आता एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजनेतही ४ कोटी १२ लाख रुपयांचा अपहार झाल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी अपहार प्रकरणाचा मुख्य सुत्रधार नाना कोरडे यांच्या समवेत अन्य दोन कर्मचाऱ्यांवर अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगड जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्याने कोटयवधी रूपयांची रक्कम परस्पर हडप केल्याचे प्रकरण नुकतेच समोर आले होते. या प्रकरणानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. अपहार करणारा कर्मचारी हा पूर्वी महिला व बाल विकास विभागात कार्यरत होता. त्यामुळे तो कार्यरत असणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजना विभागातील मागील चार वर्षांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात आली. यातही नाना कोरडे या वेतन देयक तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांने ४ कोटी १२ लाख रुपयांचा अपहार केल्याची बाब खातेनिहाय चौकशीत समोर आली आहे. बनावट वेतन फरकाची देयके बनवून त्यावर बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या मारून, ही रक्कम स्वताःच्या आणि इतर अशासकीय इसमांच्या खात्यात जमा करून अपहार केल्याची बाब समोर आली आहे.


या नंतर या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी तीन कर्मचाऱ्यांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. नाना कोरडे, जेतिराम वरुडे, महेश मांडवकर अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पोलीस निरीक्षक किशोर साळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दरम्यान अपहार प्रकरण अंगलट येण्याची जाणिव होताच नाना कोरडे यांनी २ कोटी २३ लाख रुपयांची अपहार केलेली रक्कम एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या खात्यात जमा केली असल्याचे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

नाना एकनाथ कोरडे असं त्याचं नाव आहे. पगार बीले तयार करताना कर्मचारयांचे नसलेले कपात किंवा वेतन फरक दाखवून या रकमा तो आपल्या खात्यावर वळवत असे. अन्य विभागात कार्यरत असताना कोरडे याने असे उपदव्याप केल्याची बाब समोर आली असून अपहाराचा आकडा 4 ते 5 कोटींवर जाण्याची शक्यता आहे. दरम्यान या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पाच सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली आहे.

### पाणी पुरवठा विभाग अपहार प्रकरणी गुन्हा दाखल

दरम्यान नाना कोरडे यांच्यावर पाणी पुरवठा विभागातील १ कोटी २३ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उप अभियंता राहूल देवांग यांनी याबाबतची तक्रार दिली आहे. कोरडे यांनी ७ कर्मचाऱ्यांच्या नावाने वेतन फरकाची रक्कम दाखवून त्याची खोटी देयके तयार करून ही रक्कम स्वतःच्या आणि पत्नीच्या खात्यावर वळती केली होती. या प्रकरणीही कोरडे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे वेतन फरकाच्या देयकांच्या नावाखाली कर्मचाऱ्यांने जिल्हा परिषदेला साडे पाच कोंटीची फसवणूक केली असल्याचे समोर आले आहे.

# पनवेल मनपा मधील रस्ते होणार प्रशस्त



रुंदीकरण होणारे रस्ते

लोकमान्य बाळगंगाधर टिळक मार्ग (जय भारतनाका ते अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) – १८८६.९४ चौ. मी. रस्ता रुंदीकरण

महात्मा ज्योतिबा फुले मार्ग (जय भारत नाका – विरुपाक्ष मंदिर ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) – २४०३.९७ चौ. मी. रस्ता रुंदीकरण राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) – ११३९.४० चौ. मी. रस्ता रुंदीकरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

पनवेल : पनवेल शहरामधील अरुंद रस्त्यांमुळे रहिवाशांना सततच्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणाकडे लक्ष वेधले आहे. तीन महत्वाच्या रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी भूसंपादनाची अधिसूचना बुधवारी उपविभागीय अधिकाऱ्यांनी जाहीर केली. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही महिन्यांचा कालावधी लागणार असून भूसंपादनानंतर पनवेलचे मुख्य रस्ते प्रशस्त होतील अशी चिन्हे निर्माण झाली आहे.

पनवेल महापालिकेने शहराच्या अंतर्गत रस्ते प्रशस्त करण्यासाठी अनेक अनधिकृत बांधकामांवर हातोडा मारुन रस्ते प्रशस्त केले. परंतु अजुनही मूळ पनवेल शहरातील अनेक मुख्य रस्ते प्रशस्त करणे शिल्लक आहे. पालिकेच्या बांधकाम विभागाने यासंदर्भात रस्त्यांची रचना सुचविल्यानंतर पालिकेच्या नगररचना विभागाने सुधारित प्रारुप विकास आराखड्यात शहरातील तीन मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणाची शिफारस केली. मात्र काही मालमत्ताधारकांचा भूभागाशिवाय हे रुंदीकरण शक्य नाही.

पालिकेच्या नगररचना विभागाने याबाबतचा प्रस्ताव पनवेलचे उपविभागीय अधिका-यांकडे पाठविल्यावर बुधवारपासून तीन महत्वाच्या रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी भूसंपादनाची अधिसूचना उपविभागीय अधिकाऱ्यांनी जाहीर केली. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही महिन्यांचा कालावधी लागणार असून भूसंपादनानंतर पनवेलचे मुख्य रस्ते प्रशस्त होतील अशी चिन्हे निर्माण झाली आहे.

पनवेल शहरामध्ये ये-जा करण्यासाठी दहा लहानमोठे रस्ते आहे. सध्या पनवेल शहरात वाहनांची संख्या जास्त आणि रस्ते अरुंद या समस्येमुळे सणाच्या दिवसांमध्ये शहरात वाहतूक कोंडी पाहायला मिळते. पनवेल महापालिकेने शहराचा प्रारुप विकास आराखड्यानुसार शहरातील अंतर्गत मुख्य रस्ते ३० फूटी असावे असे नियोजन केले आहे. बुधवारी पनवेलचे उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी अधिसूचना काढली. जय भारत नाका ते अन्नपूर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, जय भारत नाका – विरुपाक्ष मंदिर ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक आणि आदर्श हॉटेल ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक या मार्गांवर काही ठिकाणी अरुंद रस्ते असल्याने मालमत्ताधारकांना भूसंपादन कायदा २०१३ नुसार वाटाघाटीने नुकसान भरपाई देण्यात येणार आहे.

काही जुने घर आणि इमारतींची बांधकामे रस्त्यापासून काही मीटर हटवावी लागणार आहेत. तीन रस्ते रुंदीकरणासाठी ५,४३० चौरस मीटर जागेची गरज आहे. या जागेचे भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर महापालिकेच्या बांधकाम विभागामार्फत रस्ते रुंदीकरणाच्या कामाला सुरूवात केली जाईल. रस्ते रुंदीकरणासाठी पनवेल महापालिका सुमारे २० कोटी रुपये खर्च करणार आहे.

# सुनील म्हसकरांचा शोधनिबंध सादर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

मुंबई : शनिवार, २२ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरुकृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, कल्याण येथे 'भारतीय ज्ञान प्रणाली' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र अतिशय नियोजनबद्ध व देखण्या स्वरूपात संपन्न झाले. मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शनाने गुरुकृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, कल्याण आणि कोकण मुस्लिम एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, भिवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रात संशोधक अभ्यासक सुनील म्हसकर यांनी 'भारतीय ज्ञान प्रणालीबाबत कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमध्ये असलेल्या जागरूकतेचा अभ्यास' या विषयावर आपला शोध निबंध (रिसर्च पेपर) पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे उत्तम प्रकारे सादर केला. या रिसर्च पेपरसाठी सुनील म्हसकर यांना मार्गदर्शक प्रा.डॉ.हिना वाधवानी आणि डॉ.भक्ती सिंघानिया, डॉ.सुनीता मगरे यांनी मार्गदर्शन केले.




संशोधक अभ्यासक सुनील म्हसकर हे सध्या मुंबई विद्यापीठाच्या उल्हासनगर येथील सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय या केंद्रातून डॉ.हिना वाधवानी यांच्या मार्गदर्शनाखाली 'शिक्षणशास्त्र' या विषयात पीएचडी करत आहेत.

सुनील म्हसकर यांनी या आधी "इयत्ता नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वयं-निर्देशित अध्ययन शैलीचा अभ्यास..." या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर तर "महिला शिक्षकांच्या मानसिक स्वास्थ्याचा अभ्यास" हा राष्ट्रीय पातळीवर असे शोधनिबंध उत्तम प्रकारे सादर केले आहेत. तसेच त्यांनी आजतागायत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील अनेक चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, व वेबिनार यामध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे.

संशोधक अभ्यासक सुनील म्हसकर यांनी संशोधन कार्यातील केलेल्या या कौतुकास्पद व अभिमानास्पद कामगिरीबाबत त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.


सदर राष्ट्रीय चर्चासत्रात मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. सुनीता मगरे, वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे डीन तथा स्कूल ऑफ एज्युकेशन विभाग प्रमुख डॉक्टर गोपाळ ठाकुर, शिक्षणाधिकारी तथा प्राचार्या डॉ. वैशाली वीर, प्राचार्य विठ्ठलराव कांबळे, असोसिएट डीन डॉ. सी.ए.चक्रदेव, सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉक्टर संजय निंबाळकर यांनी मार्गदर्शन केले. तर याप्रसंगी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे संस्थापक डी. बी. वीर, कोकण मुस्लिम एज्युकेशन सोसायटीचे झाकी काजी व डॅनियल काजी, ज्येष्ठ विचारवंत जोशी बाबा, प्राचार्या डॉ.विद्युलता कोल्हे, प्राचार्य रवींद्र विलकु, प्राचार्य रितू सिंग, प्राचार्य निमा खती, डॉ.अंजली किरकिंडे प्रो.हिना खान, डॉ.नीलिमा किनगे, संशोधक अभ्यासक सचिन पाटील, अर्चना भालेवार आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व संशोधन अभ्यासक उपस्थित होते.


नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता


# पेण तालुक्यात अपघातात तीन ठार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

पेण : पेण तालुक्यातील दादर गावातील तरुणाला टेम्पोने जोरदार धकड दिल्याने, तर डावरे गावातील तरुण हमरापूर येथे मोटारसायकलवरुन घसरून तसेच कांदळेपाडा येथील तरुण रेल्वेखाली आल्याने झालेल्या वेगवेगळया अपघातात 3 तरुण जागीच ठार झाले. सदर अपघातांमुळे पेण तालुक्यावर सावट पसरले आहे. सदर अपघातांची सविस्तर माहिती अशी की, आज 25 फेब्रुवारी रोजी सकाळी दादर गावातील हरेश धनाजी पाटील वय-20, रा.दादर, ता. पेण हा तरुण पोलीस भरती परिक्षेचा अभ्यास करण्यासाठी गावाबाहेरील स्वामी परमानंद मठाकडे पायी चालत जात असताना MH06BV4092 क्रमांकाच्या थ्री व्हीलर टेम्पोने जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात डोक्याच्या मागील बाजूस जबर दुखापत होऊन मृत्यू झाला. सदर घटनेची नोंद दादर सागरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 4/2025 भादवी कलम 106 (1), 281, 125 (अ), 125 व मोटार व्हीकल ॲक्ट 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर दुपारी हमरापूर गाव येथील मोरीवर डावरे गावातील विवेक विष्णुदास घरत वय-38 हा मोटारसायकल वरून जात असताना गाडी रस्त्याकडेला स्लिप होऊन झालेल्या अपघातात मृत्यू झाला. तसेच रामवाडी रेल्वे ट्रॅकवर कांदळेपाडा गावातील निरंजन बाबुराव पाटील वय. 23, रा. कांदळेपाडा, ता. पेण हा रेल्वे खाली आल्याने झालेल्या जोरदार अपघातात मृत्युमुखी पडला. सदर घटनेची नोंद 11/2025 BSNS 194 नुसार पेण पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.







# माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन, पालिकेच्या अधिका–यांवर कारवाई ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

वसई : वसई विरार महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन केले जात असल्याचे उघड झाले आहे. वेळेत माहिती न देणे, चुकीची आणि अपूर्ण माहिती देणे असे प्रकार घडत आहे. माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्या प्रकरणी वसई-विरार महापालिकेच्या ३९ अधिकाऱ्यांवर माहिती आयोगाने दंडात्मक (शास्ती) कारवाई केली आहे.

जनसामान्यांना प्रशासकीय कारभाराची माहिती व्हावी, त्यातील भ्रष्टाचाराला आळा बसावा, यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ अस्तित्वात आला आहे. मात्र वसई विरार महापालिकेकडून माहिती अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे समोर आले आहे. पालिकेचे अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी सातत्याने करण्यात येत असतात. याबाबत विहित वेळेत माहिती न दिल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असते. वसई-विरार महानगरपालिकेतील तब्बल ३९ अधिकाऱ्यांनी या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांना माहिती आयोगाकडून दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले आहे.




यात काही अधिकाऱ्यांना दोनदा; तर काहींना तीनदा या कारवाईला सामोरे जावे लागलेले आहे. माहिती अधिकार फेडरेशन पालघर जिल्हाध्यक्ष महेश कदम यांनी माहिती अधिकाराअंतर्गत विचारलेल्या माहितीतून ही माहिती समोर आलेली आहे. यातील सर्वाधिक दंडाची रक्कम ही २५ हजार रुपये आहे; तर कमीत कमी अडीच हजार रुपये दंड लागलेला आहे. ही एकूण रक्कम २ लाख ७६ हजार इतकी आहे.

### दंडाची आकारणी केव्हा?

माहिती अधिकारात (आरटीआय) अर्जाला ३० दिवसांच्या आत उत्तर न दिल्यास माहिती अधिकार कायद्यांतर्गत तरतुदींचे उल्लंघन मानले जाते. त्यामुळे बहुतांश नागरिक माहितीकरता उच्च प्राधिकरणाकडे अपिल दाखल करत असतात.

मात्र जनमाहिती अधिकाऱ्याने जाणूनबुजून चुकीचे, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास कायद्यानुसार त्यांच्यावर दंड आकारण्याची आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. शिवाय त्यांना सेवा नियमांनुसार अनुशासनात्मक कारवाईची शिफारस करण्याचचेही अधिकार देण्यात आलेले आहेत.

यात माहिती आयोग दररोज २५० रुपये दंड आकारू शकतो. यात एकूण दंड रक्कम ही २५ हजार रुपये इतकी आहे. जनमाहिती अधिकाऱ्याला हा दंड त्याच्या पगारातून भरावा लागत असतो. केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग जनमाहिती जनमाहिती अधिकाऱ्याला दंड आकारण्यापूर्वी ऐकण्याची वाजवी संधी देत असतात.

### या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दंड

यात सर्वाधिक दंड सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांना लावण्यात आलेला आहे. त्यांना दोन वेळा २५ हजार रुपयांचा दंड लावण्यात आलेला आहे. तर सर्वाधिक कमी म्हणजेच तीन हजार रुपये दंड सहाय्यक आयुक्त सुखदेव दरवेशी तसेच नरेश व पाटील, विलास वळवी, दशरथ वाघेला, अशोक म्हात्रे ,राजेंद्र कदम, संतोष जाधव, गणेश पाटील आणि आसावरी जाधव यांना बसलेला आहे.

# आर के बाजारच्या सर्व शाखांमध्ये स्वच्छता अभियान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : झाडूने परिसर आणि किर्तनाने मन स्वच्छ करणाऱ्या संत गाडगे महाराज यांच्या जयंती दिनाचे व आर. के. बझार च्या १९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधुन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काल आर के बझारच्या सर्व 24 शाखांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यामध्ये सहभागी झालेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रथम स्वच्छतेची शपथ घेऊन आजुबाजूच्या परिसराची स्वच्छता केली. यामध्ये आर के बझारचे ४०० अधिकारी कर्मचारी, कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे १५० अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग घेतला. यावेळी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, पर्यावरण तज्ञ गोडेकर आणि आर के बझारचे मालक मनोज डुंबरे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना स्वच्छते विषयी मार्गदर्शन केले.

संक्षिप्त

## वासिंद ग्रामपंचायत उपसरपंचपदी ज्योती राजेंद्र भेरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण: वासिंद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी ज्योती राजेंद्र भेरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

कार्यरत उपसरपंच सागर कंठे यांनी राजीनामा दिल्यानंतर या रिक्त झालेल्या उपसरपंचपदी शिवसेना (उबाठा) गटाच्या ज्योती भेरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ज्योती भेरे या स्वर्गीय लोकनेते विठ्ठलराव भेरे यांची सुनबाई तर माजी उपसरपंच तथा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी राजेंद्र भेरे यांची पत्नी आहेत.

सरपंच राजेंद्र म्हसकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवड बैठकीत सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी पाठिंबा दर्शविल्याने ज्योती भेरे यांची बिनविरोध म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी शिवसेना (उबाठा) पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक उपस्थित होते. दरम्यान, येथील असलेल्या नागरी समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नवनियुक्त उपसरपंच ज्योती भेरे यांनी म्हटले आहे.

## ‘एम्का’ च्या अध्यक्षपदी डॉ. गणेश राठोड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : अंबरनाथ शहरात गेल्या ३५ वर्षां पासून वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर्स यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी व सामाजिक योगदानाकरिता कार्यरत असलेली अंबरनाथ मेडिकल चैरिटेबल असोसिएशन ही डॉक्टरांची संघटना शहराच्या विविध विधायक कार्यात सक्रिय असते. या संघटनेच्या अध्यक्षपदी नुकतीच डॉ. गणेश राठोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आलीय. यामुळे समाजातील सर्व स्तरातून डॉ. राठोड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साधारणतः ४०० पेक्षा अधिक विविध तज्ञ डॉक्टर्स, फिजिओथेरपीस्ट, सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांचा या संघटनेत समावेश आहे. प्रामुख्याने कोविड काळात जेव्हा वैद्यकीय मदतीची समाजाला खरी गरज होती. तेव्हा जीव धोक्यात घालून ही संघटना अंबरनाथ करांच्या मदतीला उभी ठाकली होती. ज्या योगदानाची महाराष्ट्राने दखल घेतली. दर ४ वर्षांनी या संघटनेच्या नविन अध्यक्षपदाची निवड घोषित होते. डॉ. उषा माहेश्वरी या मावळत्या अध्यक्षांनी शुभेच्छा देत संघटनेची पुढील सूत्र डॉ. गणेश राठोड यांच्या हाती सोपविली आहेत.

डॉ गणेश राठोड महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री असलेले हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे नात जावई आहेत. चाळीसगाव सारख्या खानदेश मधून प्रतिकूल परिस्थितीतून वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी चाळीसगाव, पनवेल, त्यानंतर आता गेली ७ ते ८ वर्षांपासुन अंबरनाथ अशा ठिकाणी शिवकृपा मल्टीस्पेशालिटी हौस्पिटल च्या माध्यमातून वैद्यकीय सेवा पुरवीत आहेत. याआधी विविध सामाजिक संस्था तसेच रोटरी क्लबच्या माध्यमातून त्यांनी समाजातील विविध घटकांपर्यंत आपली सेवा पोहोचवण्याचं काम केलंय. गेल्या २५ पेक्षा अधिक वर्षातील त्यांच्या वैद्यकीय आणि सामाजिक कार्याचा आलेख पाहता त्यांची या एम्काच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आल्याचे डॉ उषा माहेश्वरी यांनी सांगितले. त्यांच्या पत्नी सुप्रसिद्ध प्रसुती तज्ञ डॉ अरुणा राठोड यांची या प्रवासात महत्त्वाची साथ असल्याचे डॉ. गणेश राठोड यांनीही आवर्जून सांगितले.

## जलस्त्रोतांवर राबविला ‘अमृत प्रोजेक्ट’







### प्रकृतीची शुद्धता व मानवतेच्या उत्थानाच्या दिशेने निरंकारी मिशनचे एक स्वर्णिम पाऊल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या आशीर्वादाने रविवारी ‘अमृत प्रोजेक्ट’ अंतर्गत ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ अभियानाच्या तिसऱ्या टप्प्याचे आयोजन विश्वभरात केले गेले.देश-विदेशात राबविण्यात आलेल्या या प्रोजेक्ट अमृत जलस्रोतांच्या स्वच्छता अभियाना अंतर्गत ठाणे व डोंबिवली क्षेत्रामध्ये सिद्धेश्वर तलाव, हंस नगर, ठाणे (पश्चिम); रायलादेवी तलाव, वागळे इस्टेट, ठाणे, ओवळा निरंकारी भवन जवळील तलाव तसेच डोंबिवली परिक्षेत्रामध्ये गावदेवी मंदिर सार्वजनिक तलाव, डोंबिवली; गणेश तलाव, डोंबिवली (पूर्व); गणपती विसर्जन तलाव, ठाकुर्ली (पूर्व); गौरीपाडा तलाव, कल्याण (पश्चिम); नांदिवली कोळीवाडा तलाव, कल्याण (पूर्व); आडीवली ढोकाळी तलाव, कल्याण (पूर्व); उल्हास नदी, पांजरापोळ, भिसोल; माऊली तलाव, निळजे गांव; उल्हास नदी, बदलापुर (पश्चिम); टेमघर व देवजी नगर येथील तलाव, भिवंडी; खदान तलाव, अंबरनाथ (पश्चिम); बुरदुल गाव तलाव; गणेश विसर्जन घाट व भातसा नदी, वाशिंद; गंगा देवस्थान, शहापुर आणि व्यंकटेश्वर मंदिर उल्हास नदी, आंबिवली (पूर्व) इत्यादि ठिकाणी हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या व्यतिरिक्त मुंबई शहर व उपनगरातील कित्येक तलाव व समुद्र तटीय बिच, नवी मुंबईतील अनेक तलाव व मिनी सी शोअर; उरणचे तलाव व बीच, भाईंदरची उत्तन चौपाटी; वालीव(वसई) येथील तलाव, नालासोपारा येथील कळंब बिच आणि विरार येथील अर्नाळा बिच आदि अनेक ठिकाणी हे व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानाच्या दरम्यान अनेक मान्यवर व्यक्तींनी जागोजागी सदिच्छा भेट दिली आणि स्वच्छता अभियानाचे अवलोकन करण्याबरोबरच मिशनच्या मानवतेच्या प्रति केल्या जाणाऱ्या कार्यांची प्रशंसा केली. या मान्यवरांमध्ये राज्याचे पर्यटन व कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी गिरगांव चौपाटी येथे, राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी कोपरखैरणे (नवी मुंबई) येथे, आमदार संजय केळकर व आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी ठाणे येथील सिद्धेश्वर तलाव येथे तर बदलापुर येथे आमदार किसन कथोरे आदिंनी उपस्थित राहून सेवादार भक्तगणांचा उत्साह वाढविला. या व्यतिरिक्त अनेक समाजसेवी सज्जन व महापालिका अधिकाऱ्यांनीही या अभियानामध्ये आपला सहभाग नोंदवला.



एम.जे.स्कॅन सेंटर जवळील फुटपाथला लागून असलेली पाईपलाईन गेल्या चार दिवसापासून फुटली असून त्या फुटलेल्या पाईप लाईन मधून दररोज शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. याकडे पालिका प्रशासनाचे आणि संबंधितांचे दुर्लक्ष झाले आहे.ह्याला जबाबदार कोण?

## गॅस सिलेंडरच्या स्फोटात तीन जखमी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण : आंबिवली स्टेशन नजीक मोहने येथील महात्मा फुले नगरमध्ये मंगळवारी सकाळी गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत तीन जण गंभीर जखमी झाले असून, त्यापैकी अनिता जाधव (38), महिमा जाधव (१२) आणि विजय तांडेल (४८) यांना अधिक उपचारासाठी मुंबईतील सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

स्फोटामुळे घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, घरातील देवारा, घड्याळ, रॅक वरील भांडीसह दरवाजा तुटून पडला. या घटनेने नागरिकांमध्ये खळबळ पसरली. घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दलाने तत्काळ धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी येथील रहिवाशी आकाश कांबळे, शशांक माने, राजरतन कांबळे यांनी जखमींना रुग्णालयात घेवून जाण्यास मदत केली.

दरम्यान, स्थानिक रहिवाशांनी गॅस एजन्सीविरोधात वारंवार तक्रारी केल्याचे समोर आले आहे. चुकीचे सिलेंडर वितरण, गळतीविषयी दुर्लक्ष, तसेच देखभालीच्या अभावामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषींची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. यानिमित्ताने अधिकृत गॅस एजन्सी कडून केली जाणारी तपासणी, दुरूस्ती प्रश्न ऐरणी आला आहे.

या दुर्घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, सुरक्षेसाठी अधिक उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटने संदर्भात कल्याण डोंबिवली अग्निशमन दलाचे प्रमुख अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांच्या शी संपर्क साधला असता. त्यांनी प्राथमिक माहिती नुसार गॅस सिलेंडर गळती मुळे संदर्भीत घटना घडल्याचे सांगितले.

## प्रा.आरोग्य केंद्र धसईत तालुकास्तरीय महाआरोग्य शिबीर संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड: आज दि. 24/02/2025 प्रा. आरोग्य केंद्र धसई येथे तालुकास्तरीय महाआरोग्य शिबिर घेण्यात आले असून सदर शिबिराचे उद्घाटन मुरबाड विधानसभेचे आमदार किसनजी कथोरे यांच्या शुभ हस्ते झाले. तसेच आजच्या शिबिरास गंगाधार परगे (जिल्हा आरोग्य अधिकारी जि प ठाणे ), डॉ. लता गायकवाड (गट विकास अधिकारी पंचायत समिती मुरबाड) व डॉ. श्रीधर बनसोडे (तालुका आरोग्य अधिकारी) उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच शिबिरामध्ये डॉ.नंदकिशोर गोरडे व इतर वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वृंद, आशा यांनी उत्स्फूर्त पणे काम करून शिबीर यशस्वी रित्या पार पडले.

या शिबिरात एकूण 911 लाभार्थींनी या शिबिराचा लाभ घेतला यामध्ये1) डॉ दिलराज कडलस - न्यूरो सर्जन 2) डॉ. योगेश पाटील -कार्डिओलॉजिस्ट 3) डॉ. अरुण चौधरी - कार्डिओलॉजिस्ट 4) डॉ. वैभव गोरडे - ऑर्थोपेडिक सर्जन 5) डॉ. आयुषी शुक्ला – मानसिक विकार तज्ञ 6) डॉ. सचिन घोलप – स्त्री रोग तज्ञ 7) डॉ कमल चौधरी - स्त्रीरोग तज्ञ 8) डॉ मुकेश पाटील - बालरोग तज्ञ 9) डॉ. प्रशांत वाघ – जनरल सर्जन 10) डॉ प्रशांत जावरे - त्वचारोग तज्ञ 11) डॉ.सागर बांदल दंतरोग तज्ञ उपस्थित होते. शिबिरासाठी तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिरासाठी परिश्रम घेतले .

## खालापुर पोलीस ठाणे हद्दीत डान्सबारवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर/माणगाव: दिनांक 22/02/2025 रोजी खालापुर पोलीस ठाणे हद्दीत डान्सबारमध्ये बारबाला अश्लील हावभाव, संगीताचे तालावर बीभत्स नृत्य करत आहेत तसेच सदर ठिकाणी बांगलादेशी व अल्पवयीन बारबाला असण्याची शक्यता आहे. आशी आम्हाला माहीती प्राप्त झाली होती. सदरची माहीती आम्ही मा. पोलीस अधीक्षक रायगड श्री. सोमनाथ घार्गे यांना दिली. मा.पोलीस अधीक्षक यांनी कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार आम्ही, स्थानिक गुन्हे शाखेचे 3 पोलीस अधिकारी व 22 पोलीस अंमलदार, 6 महीला अंमलदार तसेच बांगलादेशी पथकाकडील 1 पोलीस अधिकारी व 1 महीला पोलीस अंमलदार यांची 3 वेगवेगळी पथके तयार करून खालापुर पोलीस ठाणे हद्दीत समुद्रा बार, हॉटेल स्वागत बार व हॉटेल पुनम बार अशा एकुण 3 ठिकाणी रवाना करण्यात आले. सदर पथकांनी सदर बारमध्ये जावुन पाहणी केली असता उपरोक्त 3 बारमध्ये बारबाला मद्यप्राशन करत असलेल्या ग्राहकाबरोबर संगीताचे तालावर अश्लील हावभाव व बीभत्स नृत्य करताना आढळुन आले तसेच सदर बारमधील कर्मचारी व ग्राहक त्यांना अश्लील हावभाव व बीभत्स नृत्य करताना प्रोत्साहित करीत असताना मिळुन आले. त्यामुळे खालापुर पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

1) खालापुर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. 60/2025 कलम 296,54,3 (5) भारतीय न्याय संहिता कायदा सह कलम महाराष्ट्र पोलीस अधिनियम 33(1), डब्ल्यु 131 सह 110, 112/117 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. बारचे नाव- हॉटेल समुद्रा आरोपी-1.राहुल नरेश यादव व इतर 22 बारबाला-8,ग्राहक-7 बारमधील

2.) खालापुर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. 61/2025 कलम 296,54,3 (5) भारतीय न्याय संहिता कायदा सह कलम महाराष्ट्र पोलीस अधिनियम 33(1), डब्ल्यु 131 सह 110,112/117 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.बारचे नाव-हॉटेल स्वागत ,आरोपी- 1. श्रीमती मिरा खातुन सुखचंद शंख व इतर 28 बारबाला-12 ग्राहक-10 बारमधील कर्मचारी-6 ,

3)खालापुर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. 62/2025 कलम 296,54,3 (5) भारतीय न्याय संहिता कायदा सह कलम महाराष्ट्र पोलीस अधिनियम 33(1), डब्ल्यु 131 सह 110, 112/117 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. बारचे नाव-हॉटेल पुनम आरोपी- 1. तोश संजीवा मोगविरा व इतर 22 बारबाला-12,ग्राहक-7,बारमधील कर्मचारी-3

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे षाखा तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अनिल गोसावी, पोलीस निरीक्षक रूपेश नरे, पोलीस उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर, पोलीस उपनिरीक्षक वाघमोडे (बांगलादेशी पथक), सहा. पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, सहा. पोलीस उपनिरीक्षक प्रसन्न जोशी, पो.हवा. यशवंत झेमसे, पो.हवा.अमोल हंबीर, पो.ह.जितेंद्र चव्हाण, पो.ह.सचिन षेलार, पो.हवा रूपेश निगडे, पो.ह. विकास खैरनार, पो.हवा.परेश म्हात्रे, पो.हवा. सुदिप पहेलकर, म.पो. हवा.अस्मिता म्हात्रे, म.पो.ह.रेखा म्हात्रे म.पो.ह. अभियंती मोकल, म.पो.ह.भाग्यश्री पाटील, म.पो.हवा. अर्चना पाटील, म.पो.हवा. झुलिता भोईर, पो.शी.तुशार कवळे, पो. शी. मोरेश्वर ओमले, पो.शी.लालासो वाघमोडे, पो.शी.ओमकार सोंडकर, पो.शी.बाबासो पिंगळे, पो.शी.अक्षय जगताप, पो.शी.भरत तांदळे, पो.शी. ईश्वर लांबोटे, पो.शी.सागर थळे, म पो.हवा.रसिका सुतार, (बांगलादेशी पथक) यांनी केली आहे.

## गुरुवारी कल्याण डोंबिवलीतील पाणीपुरवठा बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेक्षेत्रातील पाणी पुरवठा सुरळीत राहाण्यासाठी मोहिली उदंचन केंद्र येथे अत्यावश्यक तांत्रिक कामे करणे, डोंबिवली विभागातील नादुरूस्त व्हॉल्व बदलणे, कल्याण पुर्व व डोंबिवली विभागाच्या मुख्य जलवाहिन्यांची दुरूस्ती इत्यादी महत्वाची कामे करण्यासाठी गुरुवारी २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजे पर्यंत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावे, मोहिली, व नेतिवली जलशुध्दीकरण केंद्रातून संपुर्ण कल्याण पूर्व, कल्याण पश्चिमेचा काही भाग, संपुर्ण डोंबिवली पूर्व व पश्चिम परिसरात होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तरी या परिसरातील नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन कार्यकारी अभियंता अशोक घोडे आणि शैलेश मळेकर यांनी केले आहे.

## कल्याणमध्ये आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा

### रोटरी क्लब ऑफ कल्याण आणि आर्यन इन्स्टिटयूट ऑफ चेस एकसेलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रोटरी क्लब ऑफ कल्याण आणि आर्यन इन्स्टिटयूट ऑफ चेस एकसेलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड बुद्दीबळ स्पर्धा नवरंग बँक्वेट हॉल, कल्याण येथे घेण्यात आली.

या 'स्पर्धेचे उदघाटन अर्जुन अवॉर्ड विजेते ग्रँड मास्तर प्रवीण ठिपसे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी भारतातील सर्व राज्यातुन खेळाडू आले होते. स्पर्धेला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला ३५० पेक्षा जास्त खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. हि स्पर्धा डिजिटल बोर्ड द्वारे १८० देशात दाखविण्यात आली.

या स्पर्धेसाठी विविध १८ राज्यांतून इंटरनॅशनल मास्टर्स व ग्रँड मास्टर यात सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये एका दिवसात ९ राउंड्स स्विस लीग पद्धतीने घेण्यात आली. प्रत्येक खेळाडूला १०-१० मिनिटांचा वेळ होता , ५ सेकंदांचे इन्क्रिमेंट देण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस समारंभासाठी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर दिनेश मेहता व डीजीएनडी चंद्रहास शेट्टी, एजी महेंदरं हिंगोरानी' उपस्थित होते. खेळाडूंना अडीच लाखा पेक्षा जास्त बक्षिसे देण्यात आली व ९३ ट्रॉफी देण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी रोटरी क्लब ऑफ कल्याणचे सल्लागार व माजी प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी, प्रोजेक्ट चेअरमन डॉ दीपक वझे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. क्लब चे अध्यक्ष पराग कापसे, सचिव आत्माराम घाणेकर, शोभा घारपुरे, माजी अध्यक्ष अरुण सपकाळे, दिलीप कर्डेकर, दीपक पटेल, माधवी कुलकर्णी, चंद्रशेखर कुलकर्णी, हनीफ सय्यद, रेश्मा सय्यद, रुईता सपकाळे, पुर्वा कापसे, रोहन गोळे, जय राठोड उपस्थित होते. कल्याण मधील अनेक मान्यवर व डॉक्टर्स या स्पर्धेसाठी आवर्जून उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी एफआयडीई, एआयसीएफ, एमसीए, टिडीसीए, केटीबीएस या संस्थांची मान्यता व सहकार्य लाभले.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024